# 'शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात सरकार अपयशी'

खेड शिवापूर, दि. २१ (वार्ताहर) : दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकऱ्यांवर कर्ज झाल्याने राज्यात अडीचशे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात हे आघाडी सरकार अपयशी ठरले आहे, असा आरोप खासदार शिवाजीराव आढळराव-पाटील यांनी केला.

शिवगंगा खोरे (ता. हवेली) येथे जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ लांडगे यांच्या प्रयत्नांतून झालेल्या विविध विकासकामांचे उद्‌घाटन खासदार आढळराव यांच्या हस्ते करण्यात आले, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी कल्याण व आर्वी येथे बसथांबा भूमिपूजन व संरक्षक भिंत, प्राथमिक शाळा उद्‌घाटन, शिवापूर येथे व्यायामशाळा, श्रीरामनगर येथे समाजमंदिर, बसथांबा, खुले नाट्यगृह, सार्वजनिक स्वच्छतागृह, संरक्षक भिंत उद्‌घाटन व सावतामाळी रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी सोमनाथ लांडगे, रमेश वांजळे, काका धावडे यांची भाषणे झाली. या प्रसंगी भारतीय जनता पक्षाच्या जिल्हाध्यक्ष संगीताराजे निबाळकर, उमाबाई बाळासाहेब गरुड, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख राजाभाऊ रायकर, जि. प. कार्यकारी अभियंता प्रशांत औटी, जिल्हा प्रकल्प अधिकारी श्याम चव्हाण, गटविकास अधिकारी इसरार पठाण, विस्तार अधिकारी बी. टी. पवार, भोरचे माजी सभापती कृष्णाजी रांजणे, भोर-वेल्हा समन्वयक व पुणे जिल्हा बँकेचे संचालक दिलीप बाठे, शिवसेनेचे मुळशी तालुकाप्रमुख शरद ढमाले, माजी जि. प. सदस्य विलास मते, राजगड कारखान्याच्या संचालिका लक्ष्मीबाई वाव्हळ, सुजितदादा कोंडे, कल्याणचे सरपंच सुभाष डिंबळे, शिवापूरचे सरपंच बाळासाहेब खुने, श्रीरामनगरचे सरपंच शिवाजी खंडाळकर, ग्रामविकास अधिकारी मा. ना. इंगळे आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना (तालुका उपप्रमुख रमेश कोंडे) यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन केले.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.